दै. लोकपत्र दि. 13.03.2025

# गुन्हेगारांच्या विरोधात पोलीस निरीक्षक चिंचोळकर ॲक्शन मोडवर

## ग्रामीणच्या हद्दितील १८ एमपीडीए तर ५२ जणांवर हद्दपारीचा प्रस्ताव

**नांदेड/प्रतिनिधी**



ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दितील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी कंबर कसली असून वारंवार गुन्हे करणाऱ्या १८ जणांवर एमपीडीए तर ५२ जणां विरूध्द हद्दपारीचा प्रस्ताव दाखल केला असून डीबी तील एका कर्मचाऱ्याला पाच गुन्हेगार 'दत्तक' देवून त्यांच्या हालचालीवर नजर ठेवणे, त्यांचे मित्र सह सोशल मीडियावरील ॲक्टीविटीजवर नजर ठेवून आठवड्यातून एक दिवस ठाण्यात आणून समुपदेशन करत सुधारण्याची संधी देण्यात येईल. सुधार न झाल्यास अशा गुन्हेगारांवर एमपीडीए ची कारवाई करण्यात येईल असा ईशारा पोलीस निरीक्षक चिंचोळकर यांनी दिला आहे.

दि.१२ मार्च २०२५ पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लॅश आउट योजनेअंतर्गत ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीमध्ये सराईत आरोपी दत्तक योजना सुरू केली आहे.

या योजनेमध्ये ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये राहणारे गुन्हेगार जे गुन्हेगार अटल आहेत सराईत आहेत ज्यांच्यावर ३ पेक्षा जास्त गुन्ह्याची नोंद आहे. जे वारंवार गुन्हे करतात ज्यांच्यावर कारवाई करूनही पुन्हा त्यांच्याकडून गुन्हे घडले आहेत अशा आरोपी साठी सदरची दत्तक योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेमध्ये डीबी च्या अमलदार यांना प्रत्येकी पाच पाच सराईत आरोपी वाटून देण्यात आलेले आहेत.

हे प्रत्येक आरोपी कुठे राहतात काय काम करतात सध्या त्यांच्या काय हालचाली आहेत ते गावात आपल्या घरी राहतात का की बाहेरगावी कामाला गेलेले आहेत याबाबत सविस्तर माहिती काढली जात आहे. या सराईत आरोपीला रोज डीबी चे अंमलदार यांच्यामार्फत घरी जाऊन तपासले जात आहे. सदर आरोपीचे मित्र कोण त्यांच्या नावाची यादी बनवली जात आहे सदर आरोपी कुठल्या ठिकाणावर बसतात कुठून कुठे जातात काय करतात यावर बारकाईने लक्ष दिले जात आहे. सदर आरोपीचे सोशल अकाउंट फेसबुक इंस्टाग्राम स्नॅपचॅट याच्यावर बारकाईने लक्ष ठेवून हे कोणत्या पद्धतीच्या पोस्ट करतात काय पोस्ट करतात त्यांच्या पोस्टला कोण कॉमेंट्स करते याबाबत सविस्तर नोंदी घेण्यात येत आहेत. दरम्यान पोलिसांकडून सराईत गुन्हेगारांच्या प्रत्येक हालचालीवर विशेष नजर ठेवली जात आहे. शिवाय वारंवार गुन्हे करणाऱ्या आरोपींवर एमपीडीए ची कारवाई होत असल्यामुळे गुन्हेगारांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.